नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०९/०८/२०२५ ( शनिवार )**

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयात ग्रामभेटी घेवुन ग्रामस्थांसोबत पोलीसांनी साधला सुसंवाद


दिनांक ०९/०८/२०२५ नागपुर ग्रामीण जिल्हयात उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या उपविभागातील गावांना भेटी देवुन तेथील नागरिकांची ग्रामसभा घेतली.

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत श्री अनिल मस्के, अपर पोलीस अधिक्षक यांनी उमरेड उपविभागत मकरधोकडा या गावी ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांनी मौज तारणा या गावाला भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांनी नक्षी गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांनी चिचोली गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर उपविभाग अंतर्गत श्री दिपक अग्रवाल, यांनी सातगाव (वेणा) गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत श्री रमेश बरकते उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग यांनी नवेगाव खैरी परिसरातील नेऊरवाडा बच्चेरा नवेगाव खैरी, घाट खैरी येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली. उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांनी धापेवाडा गाव येथे भेट देवुन ग्रामस्थांची ग्रामसभा घेतली.

सदर ग्रामसभेला उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह संबधीत पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी आणि तेथील अंमलदार हजर होते. ग्रामस्थांची ग्राम सभा घेवुन पोलीसांनी ग्रामस्थांसोबत संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी जाणुन घेवुन त्यांचे निराकरण करण्यात आले. तसेच गावातील अवैध धंदयाबाबत माहीती गावकऱ्यांनी तात्काळ पोलीसांना दयावी असे

अवाहन पोलीसांनी केले. तसेच सदर ग्रामसभेत पोलीसांनी सायबर क्राईम आणि त्याबाबत घ्यावयाची काळजी, रस्ते सुरक्षा, महीला व बालके यांची सुरक्षा याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली. सदर ग्रामसभेला गावकऱ्यांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला.










## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री/ वाहतुक करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, १० गुन्हे नोंद एकुण २,१०,९९९/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

**नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०८/०८/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री आणि वाहतुक करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू आणि वाहतुकीसाठी वापरलेले वाहन असा एकुण २,१०,९९९/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन खापा येथे आरोपी क्रं** १ प्रशांत वासुदेव वसु वय ३५ रा वार्ड क्र २ केळवद यांच्यावर **देशी दारू वाहतुक प्रकरणी गुन्हा नोंद आहे.** आरोपी क्र. १ क्रिष्णा नारायण सोनभद्रे वय ३२ वर्ष रा नागलवाडी यांचे वर गुन्हा नोंद आहे. आरोपी क्र. २ गंगा भंयाजी काळे वय ५० वर्षे रा. पाटणसांवगी **पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी क्रं** १ गंगा भंयाजी काळे वय ५० वर्षे रा. पाटणसांवगी आरोपी क्र. २ संतोष जिलेलाल पाल रा. चौरई ब्लाक माचागोरा डॅम्प ता.

जि. छिंदवाडा म.प्र. ह. मु. कन्हान सावनेर यांचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी क्र.** रंजीत किसन डहारे वय ४५ वर्ष रा वार्ड क्र ०३ मांढळ ता कुही जि नागपुर याचेवर **प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी क्र. प्रकाश सिताराम बावनकुळे वय ३१ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ कांद्री कन्हान ता पारशिवनी याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १. १) संजय राजाराम हरडे वय ४२ रा. पेट्रोलपंप थांना ता. जि. भंडारा २) महेश उर्फ विक्की नागेक्ष्वर डोईफोठे वय ३० रा. रा. पेट्रोलपंप थांना ता. जि. भंडारा **याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार** सुषमा पप्पु धुर्वे वय ४३ वर्ष रा.मौदी ता.रामटेक जि.नागपुर यांचे वर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन पारशिवनी** अर्जुन रामयंद्र बेलेकर वय ३३ वर्ष रा. ईटगाव ता. पारशिवनी यांचे वर गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** मनिश मुन्ना भलावी वय २५ वर्ष रा खरसोली तह नरखेड यांचे वर गुन्हा नोंद आहे

अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १० गुन्हे दाखल केले आहे.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ६ आरोपीतां विरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूध्द खालील प्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन सावनेर** :— सावनेर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी नामे १. दिनेश जानबाजी अडमाची वय ३५ वर्ष रा यशंवत झोडपटी वार्ड क्र ०७ सावनेर, हा पि एच सी मागिल मर्चुरी येथील, परसिर सावनेर ०५ किमी पश्चिम आरोपी क्र २ निशीकांत मधूकर दौडकर वय ३२ वर्ष रा बोरगाव आदासा त. कळमेश्वर हा सावनेर पि एच सी मागिल मर्चुरी येथील, परसिर सावनेर ०५ किमी पश्चिम आरोपी क्र. ३ सुरज उपासराव चव्हाण वय २४ वर्ष रा बोरगाव आदासा त. कळमेश्वर हा सावनेर पि एच सी मागिल मर्चुरी येथील, परसिर सावनेर ०५ किमी पश्चिम आरोपी क्र. ४ घनश्याम गजानन धांडोळे वय १९ वर्षे रा. चिचपुरा सावनेर हा सार्वजनिक जागा रित्यान्स पेट्रोल पंप जवळ साावनेर आरोपी क्र.५ वेदांत संत्यनारायण सुपे वय १९ वर्षे रा. वार्ड नं. ०४, गणेश मगदिर जवळ सावनेर हा रिलायन्स पेट्रोल पंप सार्वजनिक जागा सावनेर आरोपी क्र. ६ क्रिश बाबुराव मेश्राम वय १८ वर्षे रा.महालक्ष्मी नगर साावनेर हा दादाजी नगर ०१ कि. मी. दक्षिण येथे अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या एकुण ६ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ६ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## अवैधरित्या तंबाखुजन्य पदार्थ (खर्रा) विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द COTPA कायदयान्वये करण्यात आल्या ४२२ कारवाया

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक ०७/०८/२०२५ ते दिनांक ०९/०८/२०२५ रोजी पर्यंत खालील पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध रित्या तंबाखुजन्य पदार्थ **(खर्रा) विक्री करणाऱ्यांवर कलम ४ COTPA कायदयान्वये कारवाही करण्यात आल्या. त्यात** पोलीस स्टेशन बुट्टीबोरी ३४, पोलीस स्टेशन बेला २३, पोलीस स्टेशन एम आय डी सी (बोरी) १३, पोलीस स्टेशन कन्हान ११, पोलीस स्टेशन खापरखेडा १५, पोलीस स्टेशन मौदा २३, पोलीस स्टेशन काटोल ३१, पोलीस स्टेशन नरखेड २९, पोलीस स्टेशन कोंढाळी ४, पोलीस स्टेशन जलालखेडा १२, पोलीस स्टेशन सावनेर १७, पोलीस स्टेशन कळमेश्वर २०, पोलीस स्टेशन केळवद १९, पोलीस स्टेशन खापा ३७, पोलीस स्टेशन रामटेक ११, पोलीस स्टेशन पारशिवनी १०, पोलीस स्टेशन देवलापार २७, पोलीस स्टेशन अरोली १७, पोलीस स्टेशन उमरेड २३, पोलीस स्टेशन भिवापूर २७, पोलीस स्टेशन कुही ०७, पोलीस स्टेशन वेलतूर १२ याप्रमाणे संपूर्ण नागपूर(ग्रा) जिल्हयात **एकुण ४२२ कारवाया करण्यात आल्या आहेत**. तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयांअतर्गत शाळा कॉलेज परीसरात सतत पेट्रोलींग करून COTPA कायदयान्वये करावाई करण्यात येत आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६७७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०९/०८/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६७७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३१ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४  रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३२ आरोपी अशा एकुण १२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३३ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण ८८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे २६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २४ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे ३२ आरोपी अशा एकुण १०९ उरेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६७७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०८/०८/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०९/०८/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री. रमेश बरकते, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत झिंझेरिया, पवनी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री. रमेश बरकते, यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. रामटेक टाउन येथे नाकाबंदी करण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये रामटेक पोलीस स्टेशन सह दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने